Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC
# SWO, Gr-B

## Previous Year Paper

### 18 Aug, 2024

Teachingninja.in

समाज कल्याण अधिकारी गट-ब सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब इतर मागास बहुजन कल्याण विभाग संयुक्त चाळणी परीक्षा परीक्षा दि. १८ ऑगस्ट, २०२४

# A

→ संच क्रमांक

2023

**Y18**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

142005

## प्रश्नपुस्तिका
## चाळणी परीक्षा / SCREENING TEST

वेळ : 1 तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा–क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

↑ केंद्राची संकेताक्षरे ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर–क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न–क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करतांना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील.''**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

SEAL

### ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा

Teachingninja.in

1. 'पद्म आहे नाभीत ज्याच्या' या शब्दसमुहासाठी एक शब्द निवडा.

(अ) ब्रम्ह (ब) पद्मनाभ (क) विष्णू (ड) महेश

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) व (ब) पर्याय बरोबर (2) फक्त (ब) व (क) पर्याय बरोबर

(3) फक्त (ब) व (ड) पर्याय बरोबर (4) फक्त (क) व (ड) पर्याय बरोबर

---

2. सावळा ग रामचंद्र। रत्नमंचकी झोपतो।
त्याला पाहता लाजून। चंद्र आभाळी लोपतो।
या काव्यपंक्ती कोणत्या अलंकाराचे उदाहरण आहे?

(1) रूपक (2) उपमा (3) व्यतिरेक (4) अनन्वय

---

3. 'जेठा मारून बसणे' या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ ओळखा.

(1) आंदोलनास बसणे (2) रिकामा बसणे (3) उपोषणास बसणे (4) ठाण मांडून बसणे

---

4. 'अरसिकेषु कवित्वनिवेदनय' या म्हणीचा खालीलपैकी कोणता अर्थ आहे?

(1) अरसिक माणसाला काव्य वाचून दाखविणे व्यर्थ.

(2) अरसिक माणुस कवित्व करू शकत नाही.

(3) अरसिक माणसाला कवितेचा अर्थ समजत नाही.

(4) अरसिक माणसाला कवितेचे निवेदन जमत नाही.

---

5. कान, रान, रूख या शब्दांचा प्रकार ओळखा.

(1) फारसी शब्द (2) देशी शब्द (3) तद्भव शब्द (4) तत्सम शब्द

---

6. 'अंशाभ्यस्त' शब्द ओळखा.

(1) बारका (2) बारकावा (3) बारकुंडा (4) बारीकसारीक

---

7. 'असुर' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.

(1) सूर (2) बेसूर (3) कसूर (4) सुर

---



1442005 Teachingninja.in

8. अनेकदा शब्दांना एका विभक्तीचे प्रत्यय लावून नंतर तृतीयादी विभक्तींचे प्रत्यय लागतात, अशा विभक्तीस काय म्हणतात ?
(1) कारक विभक्ती (2) सविकरणी विभक्ती
(3) उपपद विभक्ती (4) संबोधन विभक्ती

9. 'प्रस्कर्त होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?
(1) शरण येणे (2) स्फुरण येणे (3) लाज येणे (4) समज येणे

10. टोपी, गोलंदाज, तुमान हे कोणत्या भाषेतील शब्द आहेत ?
(1) कानडी (2) फारसी (3) अरबी (4) पोर्तुगीज

11. होमरूल लीगच्या अधिवेशनात ठरल्याप्रमाणे हिंदी स्वराज्याची बाजू मांडण्यासाठी लोकमान्य टिळकांनी 1 जुलै 1917 साली इंग्लंडला पाठविलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व खालीलपैकी कोणाकडे दिले होते ?
(1) जोसेफ बॉप्टिस्टा (2) लाला लजपतराय
(3) न.चि. केळकर (4) विष्णू शास्त्री चिपळूणकर

12. 'आमचे लाडके यशवंतरावजी, महाराष्ट्राचे प्रतिशिवाजी' अशी प्रथम घोषणा कोणी केली ?
(1) प्र.के. अत्रे (2) विष्णुमास्तर निगडीकर
(3) केशवराव जेधे (4) एस.एम. जोशी

13. 1907 मध्ये स्त्रियांसाठी सामाजिक कार्य करणाऱ्या 'वनिता विश्राम' या संस्थेची स्थापना कोणी केली ?
(1) पंडिता रमाबाई (2) रमाबाई रानडे (3) डॉ. रखमाबाई ठाकूर (4) डॉ. आनंदीबाई जोशी

14. जोड्या जुळवा.

| | जिल्हा | | किल्ल्यांचे नाव |
|---|---|---|---|
| (अ) | सिंधूदुर्ग | (i) | नळदुर्ग |
| (ब) | सांगली | (ii) | मच्छिंद्रगड |
| (क) | धाराशिव | (iii) | पद्मगड |
| (ड) | रायगड | (iv) | अवचितगड |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

**कच्च्या कामासाठी जागा**

Teachingninja.in

**15.** 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील पुढीलपैकी कोणत्या प्रशासकीय विभागात लिंग–गुणोत्तर सर्वाधिक होते ?

(1) कोकण (2) नाशिक (3) नागपूर (4) अमरावती

---

**16.** खालील विधाने पहा.

(अ) रहर मैदान हे छोटा नागपूर पठाराच्या उत्तर–पश्चिमेला आहे.

(ब) रहर मैदान हे गंगेच्या खालच्या (Lower) मैदानाचा भाग आहे.

(क) दामोदर आणि स्वर्णरिखा नद्या रहर मैदानातुन वाहतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (अ) आणि (ब) बरोबर आहेत. (2) विधान (अ) आणि (क) बरोबर आहेत.

(3) विधान (ब) आणि (क) बरोबर आहेत. (4) विधान (अ), (ब) आणि (क) बरोबर नाहीत.

---

**17.** महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरल संदर्भात पुढीलपैकी **योग्य** विधान कोणते ते लिहा.

(अ) त्यांची नियुक्ती राज्यपाल करतात.

(ब) त्यांचा कार्यकाल 6 वर्षांचा असावा.

(क) त्यांचे वेतन आणि भत्ते उच्च न्यायालय ठरविते.

(ड) घटकराज्यांच्या विधीमंडळाच्या कामकाजात ते सहभाग घेऊ शकतात पण त्यांना सभागृहात मतदानाचा अधिकार देण्यात आलेला नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क), (ड) (2) (अ), (क) (3) (ब), (क) (4) (अ), (ड)

---

**18.** महाराष्ट्रासंबंधी पुढील विधानापैकी **योग्य** विधान कोणते ते सांगा.

(अ) लोकसभेच्या महाराष्ट्रात 48 जागा आहेत.

(ब) राज्यसभेसाठी महाराष्ट्रातून 19 प्रतिनिधी निवडून दिले जातात.

(क) महाराष्ट्रात लोकसभेच्या 48 जागांमधे 1 मतदारसंघ/जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) (2) (अ), (ब) (3) (ब), (क) (4) (अ)

---

**19.** भारताची राज्यघटना तयार करण्याबाबतची योजना 'कॅबीनेट मिशन'ने कोणत्या दिवशी प्रसिद्ध केली होती ?

(1) 16 मे 1944 (2) 16 मे 1945 (3) 16 मे 1946 (4) 16 मे 1947

---

कच्च्या कामासाठी जागा



Teachingninja.in

20. भारतीय संविधानात नमूद केलेल्या लोकसेवा आयोगासंदर्भातील तरतुदींसंदर्भात पुढीलपैकी **योग्य** विधाने कोणती आहेत ?

(अ) राज्य लोकसेवा आयोगाचे सदस्य किती असावेत हे राज्यपाल ठरवतात.

(ब) राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची नियुक्ती राज्यपाल करतात.

(क) काही राज्यांसाठी संयुक्त लोकसेवा आयोग अस्तित्वात असेल तर त्याच्या अध्यक्षांची निवड राष्ट्रपती करतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) (2) (अ), (ब) (3) (अ), (क) (4) (ब), (क)

---

21. वैज्ञानिक प्रगतीमुळे व्यापार व उद्योगधंद्याची वाढ होऊन शहरी समुदायात आर्थिकदृष्ट्या नव्याने उदयास आलेला वर्ग म्हणजे...

(1) मध्यमवर्ग (2) कनिष्ठवर्ग (3) वरिष्ठवर्ग (4) भांडवलदार वर्ग

---

22. खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

(1) पूर्वी ग्रामीण समाजात अठरा बलुतेदार होते.

(2) पूर्वी ग्रामीण समाजात बारा अलुतेदार होते.

(3) ग्रामीण जीवनातील बलुतेदारी पद्धती, श्रमविभाजनाच्या तत्त्वावर आधारित होती.

(4) बलुतेदारी पद्धतीत ग्रामीण व्यावसायिकांना रोख रकमेच्या स्वरूपात मोबदला दिला जात होता.

---

23. आधुनिकीकरण सिद्धांताच्या प्रक्रियेचा क्रम लावा.

(अ) सर्वमान्य उत्पादन व मोठ्या प्रमाणात वापर

(ब) तांत्रिक परिपक्वता अनुकरण

(क) पारंपारिक वैचारिकता

(ड) प्रागतिक विचारधारा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (क), (ड), (ब), (अ) (2) (अ), (ब), (ड), (क)

(3) (अ), (ब), (क), (ड) (4) (अ), (क), (ब), (ड)

---

कच्च्या कामासाठी जागा

14200051420005 1420005 Teachingninja.in

24. भारतातील शास्त्रज्ञ व त्यांनी संशोधन क्षेत्रात केलेल्या कार्याच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | होमी भाभा | (i) | हरित क्रांती |
| (ब) | डॉ. विक्रम साराभाई | (ii) | दुग्ध विकास |
| (क) | डॉ. स्वामिनाथन | (iii) | अणुऊर्जा |
| (ड) | डॉ. वर्गिस कुरियन | (iv) | अंतराळ, उपग्रह |

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

25. दुय्यम आधुनिकीकरण म्हणजे.....

(1) विकसनशील राष्ट्रांतील आधुनिकीकरण
(2) विकसित राष्ट्रांतील आधुनिकीकरण
(3) प्रगत राष्ट्रांतील आधुनिकीकरण
(4) युरोप खंडातील बहुसंख्य राष्ट्रातील आधुनिकीकरण

26. महाऊर्जा 'अटल सौर कृषी पंप योजना -2' साठीचे लाभार्थी निकष.....

(अ) शेतकऱ्याकडे शाश्वत जलस्त्रोत असावा.
(ब) पारंपारिक वीज जोडणी नसलेले गावातील शेतकरी.
(क) अति दुर्गम भागात शेती करणारे शेतकरी.
(ड) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वर्गासाठी 5% व सर्वसाधारण वर्गासाठी 15% लाभार्थी हिस्सा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) बरोबर व (क), (ड) चूक
(2) (अ), (ब), (क), (ड) बरोबर
(3) (अ), (ब), (क) बरोबर व (ड) चूक
(4) (अ), (क) बरोबर व (ब), (ड) चूक

27. खगोलशास्त्रीय अंतर प्रकाशवर्षांमध्ये मोजण्याचे कारण खालीलपैकी कोणते आहे ?

(1) तारकीय पिंडामधील अंतर बदलत नाही
(2) तारकीय पिंडांचे गुरुत्वाकर्षण बदलत नाही
(3) प्रकाश नेहमी सरळ रेषेत प्रवास करतो
(4) प्रकाशाचा वेग संपूर्ण विश्वात स्थिर असतो



Teachingninja.in

28. भारतात सौरऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी कोणत्या वर्षी 'जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय सौर मिशन' सुरू करण्यात आले?

(1) 2013 (2) 2010 (3) 2017 (4) 2022

29. खालीलपैकी कोणती गोष्ट वैज्ञानिक विचारसरणीच्या मार्गातील अडथळा ठरते?

(1) बुद्धिप्रामाण्य (2) कार्यकारणसंबंधांचा शोध

(3) स्वमताचा अभिनिवेश (4) तर्कशुद्धता

30. खालील विधाने **सत्य** की **असत्य** ते लिहा.

(अ) जसे जीवनमान व स्त्री शिक्षण सुधारते तसे लोकसंख्या दरवाढीचा दर कमी होतो.

(ब) वैयक्तिक संगणक व इंटरनेटमुळे जगातील माहितीची दारे सर्वांना खुली झाली आहेत.

(क) अवकाशातील संशोधन व उपग्रहामुळे दुरसंचारणात व हवामानाचा अंदाज घेण्यात मदत होते.

(ड) जीवशास्त्रातील संशोधनामुळे अनुवंशिक गुणधर्म एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कसे जातात याची रासायनिक यंत्रणा माहीत झाली.

**पर्यायी उत्तरे :**

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | असत्य | सत्य | असत्य | असत्य |
| (2) | सत्य | सत्य | सत्य | सत्य |
| (3) | असत्य | असत्य | सत्य | सत्य |
| (4) | सत्य | असत्य | सत्य | असत्य |

31. मे 1966 मध्ये भारत सरकारने _______ उद्योगांमध्ये आयात-निर्यात धोरण उदार किंवा शिथिल केले.

(1) 89 (2) 59 (3) 69 (4) 19

32. सन 2022-23 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात पुढील 25 वर्षातील आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने अग्रक्रम निर्धारित करण्यात आले.

(अ) प्रधानमंत्री गतीशक्ती (ब) सर्वसमावेशक विकास

(क) उत्पादकतेत आणि गुंतवणूकीत वाढ (ड) गुंतवणूकीसाठी वित्तीय तरतूद

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) (2) (ब), (क) आणि (ड)

(3) (अ), (क) आणि (ड) (4) वरीलपैकी सर्व

**कच्च्या कामासाठी जागा**

Teachingninja.in

**33.** खालीलपैकी कोणते/ती विधान/ने **चूक** आहे/त ?

(अ) प्रधानमंत्री जन–धन योजना हा वित्तीय समावेशाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे.

(ब) भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रत्येक गावात कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'सेवा क्षेत्र दृष्टिकोन' तयार केली असून तालुका हा घटक निश्चित केला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) चूक आहे
(2) फक्त (ब) चूक आहे
(3) दोन्ही (अ) आणि (ब) चूक आहेत
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**34.** ________ ही बँक जिल्हा मध्यवर्ती बँक आणि रिझर्व्ह बँक तसेच नाबार्ड यांच्यातील दुवा म्हणून कार्य करते.

(1) प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था
(2) राज्य सहकारी बँक
(3) नागरी सहकारी बँक
(4) भूविकास बँक

---

**35.** द्विपक्षीय/प्रादेशिक स्तरावर भारताचा व्यापार वाढविण्याच्या उद्देशाने, 2022-23 या कालावधीत ________ सोबत भारताचे व्यापार करार अंमलात आले.

(अ) यूएई (ब) यूके (क) कॅनडा (ड) ऑस्ट्रेलिया

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ) आणि (ब)
(2) केवळ (ब) आणि (क)
(3) केवळ (क) आणि (ड)
(4) केवळ (अ) आणि (ड)

---

**36.** 1950-51 पासून भारतातील महागाई किंमत वाढीसाठी खालीलपैकी कोणते मागणीप्रेरित घटक कारणीभूत होते ?

(अ) सरकारी खर्चात वाढ
(ब) तेलाच्या किंमतीत वाढ
(क) काळा पैसा
(ड) पैशाच्या पुरवठ्यात विस्तार

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क)
(2) (अ), (क) आणि (ड)
(3) (ब), (क) आणि (ड)
(4) वरीलपैकी सर्व

---

**37.** राजकोषीय तुटीतून व्याजदेय रक्कम वजा करता जी शिल्लक उरते त्याला ________ असे म्हणतात.

(1) महसुली तुट (2) अर्थसंकल्पीय तुट (3) प्राथमिक तुट (4) महसुली वाढावा

---



Teachingninja.in

38. भाववाढीचा बाह्य व्यापारावर पुढीलपैकी कोणता परिणाम दिसून येतो?

(1) आयातीत वाढ होऊन निर्यातीत घट होते (2) आयातीत घट होऊन निर्यात वाढते

(3) आयात आणि निर्यातीत घट होते (4) वरीलपैकी सर्व

39. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 2022-23 मध्ये भारताचे वनस्पती तेलावरील आयात बिल US $ 20.8 अब्ज झाले.

(ब) 2022-23 या कालावधीत भारतातील एकूण खाद्यतेलाच्या आयातीत पाम तेलाचा वाटा सर्वात जास्त म्हणजे सुमारे 76.3 टक्के होता.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **योग्य** आहे/त?

(1) दोन्ही (अ) आणि (ब) योग्य आहेत (2) फक्त (ब) योग्य आहे

(3) फक्त (अ) योग्य आहे (4) वरीलपैकी कोणतेही नाही

40. ग्राहक किंमत निर्देशांक चलनवाढीचे खालीलपैकी कोणते घटक आहेत?

(अ) इंधन (ब) पादत्राणे (क) अन्न (ड) गृहनिर्माण

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ), (ब) आणि (क) (2) केवळ (अ) आणि (क)

(3) केवळ (अ) (4) वरीलपैकी सर्व

41. जून 2023 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आमसभेच्या 78व्या सत्राच्या अध्यक्षपदी कोणाची निवड झाली?

(1) अब्दुल्ला शाहीद (2) डेनिस फ्रान्सिस (3) सिसाबा कोरोसी (4) वोलकॅन बॉझकीर

42. भारतातील कोणत्या राज्याने सर्वप्रथम हरित हायड्रोजन धोरण लागू केले आहे?

(1) केरळ (2) गोवा (3) महाराष्ट्र (4) हिमाचल प्रदेश

43. जागतिक आरोग्य संघटनेचा हेपॅटायटिस-सी संदर्भात 'गोल्ड टायर' (Gold tier) दर्जा प्राप्त करणारा पहिला देश कोणता?

(1) इराण (2) इराक (3) इजिप्त (4) सिरीया

44. महाराष्ट्र शासनाने 'स्वच्छ मुख अभियान' या उपक्रमाचा सदिच्छादूत म्हणून कोणाची निवड केली आहे?

(1) अमिताभ बच्चन (2) नाना पाटेकर

(3) पोपटराव पवार (4) सचिन तेंडुलकर

कच्च्या कामासाठी जागा

Teachingninja.in

**45.** मे 2023 मध्ये अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी कोणाची नेमणूक झाली ?

(1) अतुल पेठे (2) राजन दळवी (3) प्रशांत दामले (4) महेश एलकुंचवार

**46.** जुलै 2023 मध्ये आयोजित भारत आणि मंगोलिया देशाच्या द्विराष्ट्रीय संयुक्त लष्करी सरावाचे नाव काय होते ?

(1) नोमॅडिक एलेफंट 23 (Nomadic Elephant 23)

(2) खंजर युद्ध सराव

(3) डेझर्ट ईगल II 23 (Desert Eagle II 23)

(4) हँड इन हँड 23 (Hand in Hand 23)

**47.** 'आरोग्य मैत्री एड क्युब' या भारतातील पोर्टेबल हॉस्पिटलचे अनावरण डिसेंबर 2023 मध्ये कुठे केले गेले ?

(1) जम्मू (2) गुरुग्राम (3) आसाम (4) सोलापुर

**48.** नेहरू मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी सोसायटीचे बदललेले नवीन नाव काय आहे ?

(1) प्राईम मिनिस्टर्स म्युझियम अँड लायब्ररी सोसायटी

(2) इंडिया मेमोरियल म्युझिअम अँड लायब्ररी सोसायटी

(3) भारत मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी सोसायटी

(4) पंडीत दिनदयाल मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी सोसायटी

**49.** खालील विधाने लक्षात घेऊन **योग्य** पर्याय निवडा.

(अ) धनंजय चंद्रचूड हे भारताचे 50 वे सरन्यायाधीश आहेत.

(ब) यू.यू. ललीत हे भारताचे 49 वे सरन्यायाधीश होते.

(क) राज्यघटनेतील अनुच्छेद 125 नुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (अ) व (क) बरोबर आहे

(2) विधान (अ) व (ब) बरोबर आहे

(3) विधान (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत

(4) विधान (अ) बरोबर असून (ब) व (क) चूक आहेत




Teachingninja.in

50. 'पॅराक्वॅट' या रसायनावर कोणत्या राज्याने बंदी घातली आहे ?

(1) ओडिसा (2) पंजाब (3) हिमाचल प्रदेश (4) मणिपूर

51. पुढील घनाचे निरीक्षणाद्वारे 3 च्या विरुद्ध बाजूस कोणता अंक येईल ?




(1) 1 (2) 2 (3) 3 (4) 5

52. सारंग जवळ 50 पैशाची 200 नाणी आहेत, 25 पैशाची 300 नाणी आहेत व 20 पैशाची 400 नाणी आहेत, 10 रु. च्या 60 नोटा व 5 रु. च्या 40 नोटा आहेत. सारंगने आपल्या पैशातून सरीताला 90 रु. दिले तर सारंग जवळ एकूण किती रुपये राहतील ?

(1) 965 (2) 770 (3) 875 (4) 970

53. अशोक हा रोषणचा भाऊ आहे. टिना हि अतुलची बहीण आहे. रोषण हा टिनाचा मुलगा आहे. तर अशोकचे टिनाशी नाते काय ?

(1) काका (2) बहीण (3) भाऊ (4) मुलगा

54. इथे गणितीय क्रियांसाठी संकेताचा वापर केलेला आहे. '$\Delta$' हे चिन्ह वा संकेत गुणाकारासाठी वापरले आहे. इतर चिन्हांच्या क्रिया ओळखा आणि दिलेल्या राशीची उकल करा.

जर $4\Delta6\oplus3=21$ आणि $4\Delta6\square3=8$ तर $(35\oplus5)\square6\Delta7=$ ?

(1) $\frac{30}{42}$ (2) 30 (3) 53 (4) 35

55. एका टोपलीत काही फळे आहेत. त्यापैकी 8 सोडून सर्व केळी आहेत. 12 सोडून सर्व सफरचंद आहेत व 16 सोडून सर्व संत्री आहेत तर त्या टोपलीत सफरचंद किती आहेत ?

(1) 4 (2) 6 (3) 8 (4) 10

56. समजा भरतच्या घड्याळात 2 वाजून 42 मिनिटे झालीत. अशावेळी तास काटा व मिनिट काटा कोणत्या दिशेने व कोणत्या कोनात असेल ?

(1) उत्तर आणि पश्चिम दिशा, लघुकोन
(2) पूर्व आणि पश्चिम दिशा, विशालकोन
(3) दक्षिण आणि पश्चिम दिशा, काटकोन
(4) दोन्ही पश्चिम दिशेने, विशालकोन

कच्च्या कामासाठी जागा

1420005
Teachingninja.in
Teachingninja.in

57. व्यक्तिअंतर्गत कौशल्ये बाबतची खालील विधाने वाचा व **योग्य** पर्याय निवडा.

**विधान 1** – मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात व्यक्तिअंतर्गत कौशल्य आवश्यक आहेत.

**विधान 2** – व्यक्तिअंतर्गत कौशल्ये असल्याशिवाय प्रशासकीय अधिकाऱ्याला लोकहित साधता येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) **विधान 1** व **2** चुकीचे आहेत.

(2) **विधान 1** व **2** बरोबर आहेत.

(3) **विधान 1** बरोबर व **2** चुकीचे आहे.

(4) **विधान 1** चुकीचे व **2** बरोबर आहे.

---

58. जर घड्याळात 3 वाजून 17 मिनिटे झाली असतील तर आरशातील प्रतिमा कोणती वेळ दर्शवेल?

(1) 8:43 (2) 8:33 (3) 8:17 (4) 9:17

---

59. Administration आणि Love ह्या शब्दातील अक्षरे किती प्रकारे वेगवेगळ्या मार्गाने मांडता येतील?

(1) 3,60,580 आणि 21 (2) 3,60,680 आणि 24

(3) 3,61,780 आणि 23 (4) 3,62,880 आणि 24

---

60. चार मजूर सहा दिवसात 9600 गट्टु तयार करतात तर अठरा मजूर चार दिवसात किती गट्टु तयार करतील?

(1) 25,500 (2) 26,600 (3) 27,700 (4) 28,800

---

61. दोन सलग विषम संख्येचा गुणाकार 8099 आहे. तर त्या दोन संख्यापैकी मोठी संख्या कोणती आहे?

(1) 81 (2) 79 (3) 91 (4) 41

---

62. रिक्त चौकोनातील योग्य अक्षरे लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| C | G | K | O | S | ? |
| K | M | O | Q | S | ? |

(1) P Q (2) W T (3) W U (4) U R

---

कच्च्या कामासाठी जागा




Teachingninja.in

63. खालील अक्षरमाळ पूर्ण करा.

CCEFGIILKOM ??


(1) RO (2) PR (3) OR (4) QS

64. प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य अंक लिहा.




(1) 27 (2) 36 (3) 9 (4) 15

65. आकृती मधील त्रिकोणाची संख्या सांगा.



(1) 30 (2) 25 (3) 23 (4) 27

66. रिकाम्या जागी योग्य अंक लिहा.

JK4 : NO9 : : RS10 : VW _____

(1) 12 (2) 14 (3) 16 (4) 18


67. एका मिनिटात एका ड्रमचा $\frac{4}{9}$ भाग पाण्याने भरतो तर उर्वरित भाग भरण्यास किती वेळ लागेल?

(1) $\frac{8}{4}$ (2) $\frac{7}{4}$ (3) $\frac{6}{4}$ (4) $\frac{5}{4}$

कच्च्या कामासाठी जागा

Teachingninja.in

68. आकृतीत दर्शविल्याप्रमाणे गोलाकार टेबलाच्या भोवती आठ व्यक्ती M, N, O, P, Q, R, S आणि T बसलेल्या आहेत. त्यांचे तोंड टेबलाच्या मध्याकडे आहे. जर त्यांनी आपले स्थान तीन जागा घड्याळाच्या विरुद्ध दिशेने सरकवले तर खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?




(1) N चे तोंड पश्चिमेकडे असेल. (2) P चे तोंड दक्षिणेकडे असेल.
(3) R चे तोंड पूर्वेकडे असेल. (4) O चे तोंड उत्तरेकडे असेल.

---

69. A ही K ची बहीण आहे. N हा K चा भाऊ आहे. S हा N चा भाऊ आहे. R ही S ची मुलगी आहे. तर A आणि R मध्ये काय नाते आहे ?

(1) आई – मुलगी (2) आत्या – भाची (3) भाऊ – बहीण (4) बहीण – सून

---

70. एका रेल्वेस्टेशनच्या रूळाच्या बाजूला विजेचे खांब प्रती 40 मीटर अंतरावर एक याप्रमाणे लागले आहेत. एक प्रवासी त्याच्या जवळून गाडी जात असतांना खांब मोजतो. सदर गाडीचा वेग 50 किमी प्रती तास असेल तर 3 तासात किती खांब मागे जातील ?

(1) 3750 (2) 3640 (3) 2630 (4) 1620

---

71. 'माणुसकीच्या गरजा भागविण्यासाठी सर्वांचा समान सहभाग म्हणजे समानता होय'. ही विचारधारा कोणती आहे ?

(1) बहुसांस्कृतीकवाद (2) जागतिकीकरण (3) मार्क्सवादी स्त्रीवाद (4) यापैकी नाही

---

72. एखाद्या उद्योगाच्या चढ-उतारामध्ये आलेल्या बेरोजगारीला __________ बेरोजगारी म्हणतात.

(1) अस्थायी (2) चक्रीय (3) यंत्रीकृत (4) सुशिक्षित

---

73. माहिती व तंत्रज्ञान कायदा __________ वर्षी अस्तित्वात आला व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी __________ पासून सुरू झाली.

(1) 2000, 15/10/2000 (2) 2000, 17/10/2000
(3) 2005, 15/10/2005 (4) 2005, 17/10/2005

---



Teachingninja.in

74. ''निसर्ग सर्वोत्तमाची सर्वात लायक त्याची निवड करतो, अस्तित्व राखण्यासाठी संघर्ष होतो''. हा कोणाचा सिद्धांत मानव उत्क्रांतीला लागू केलेला आढळतो ?

(1) मार्टीन ल्युथर किंग (2) ॲरीस्टॉटल (3) डार्विन (4) प्लुटो

75. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) विसाव्या शतकात तमिळनाडूत दलितांच्या आर्थिक व राजकीय दर्जात बरीच सुधारणा घडून आली.

(ब) विसाव्या शतकात तेथे नादार चळवळ सुरू झाली.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने बरोबर असून (ब) हे (अ) चे कारण आहे.

(2) दोन्ही विधाने बरोबर असून (ब) हे (अ) चे कारण नाही.

(3) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

(4) केवळ (ब) हे बरोबर आहे.

76. 1897 मध्ये बेल्लुर येथे रामकृष्ण मठाची स्थापना करणाऱ्या समाज सुधारकाचे नाव सांगा.

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) राजा राम मोहन रॉय

(3) स्वामी विवेकानंद (4) स्वामी रामकृष्ण परमहंस

77. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) जगातील सर्व देशांत स्तरीकरणाची एक समान व्यवस्था आढळून येते.

(ब) समाजवादी देशही यात सामील आहेत.

उपरोक्त पैकी कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/त ?

(1) केवळ (अ) (2) केवळ (ब) (3) एकही नाही (4) (अ) व (ब) दोन्ही

78. अनेक लोकांचे निरीक्षण करून शरीररचनेच्या दृष्टीने 1. Pyknic 2. Athletic 3. Asthenic हे तीन मुख्य प्रकार कोणी सांगितले आहेत ?

(1) शेल्डन (2) क्रेश्मर (3) गिलफर्ड (4) आल्वर्ट, व्हरनॉन, लिंडझे

79. दि. 14 ऑगस्ट 1935 रोजी खालीलपैकी कोणत्या देशात सामाजिक सुरक्षा अधिनियम लागू करण्यात आला ?

(1) ब्रिटन (2) अमेरिका (3) स्पेन (4) भारत

**कच्च्या कामासाठी जागा**

Teachingninja.in

80. मानवविकास किंवा अभिवृद्धिबद्दल __________ यांचे मत होते की 'मुल ही कोरी पाटी आहे व संस्कार त्याचे व्यक्तिमत्व घडवते.'

(1) डार्विन (2) जीन रूसो (3) स्टॅव्ले हॉर्न (4) जॉन लोके

---

81. __________ समितीने 1960 मध्ये सादर केलेल्या आपल्या अहवालात 'सामाजिक सुरक्षा विभाग' स्थापना करण्याची शिफारस केली.

(1) रेणुका रे समितीचा अहवाल (2) कोठारी आयोगाचा अहवाल
(3) रंगनाथन समितीचा अहवाल (4) अर्जुन सेनगुप्ता समितीचा अहवाल

---

82. बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, 1986 नुसार "बालक" याचा अर्थ काय?

(1) वय वर्ष 12 पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती.
(2) वय वर्ष 14 पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती.
(3) वय वर्ष 16 पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती.
(4) वय वर्ष 18 पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती.

---

83. गुप्ततेचे तत्व (Principle of confidentiality) हे समाजकार्याच्या खालील पद्धतीचे तत्व आहे.

(1) गटकार्य (2) सामाजिक संशोधन (3) व्यक्तिसाह्य (4) समुदाय संघटन

---

84. कोणत्याही देशाच्या मानवी विकास निर्देशांक मापनामध्ये खालील बाबींची गणना होते.

(1) बेरोजगारांची संख्या, गरीबी व प्रदूषण
(2) आपत्ती व्यवस्थापन, बेरोजगारी व कुपोषण
(3) जन्माच्या वेळी आयुष्यमान, शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे, सकल राष्ट्रीय उत्पन्न
(4) यापैकी काहीही नाही

---

85. भारतीय समाजशास्त्रज्ञ __________ यांनी संप्रदायवादाचे सहा प्रकार स्पष्ट केले आहेत.

(1) दीपांकर गुप्ता (2) टी.के. ओमेन (3) बिपीनचंद्र (4) असगर अली इंजिनिअर

---

86. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, 1989 मधील कोणत्या कलमान्वये "कर्तव्यातील हयगयीबद्दल शिक्षा" प्रस्तावित करण्यात आली आहे?

(1) कलम 4 (2) कलम 10 (3) कलम 13 (4) कलम 16

---



Teachingninja.in

87. __________ ची निर्मिती सामाजिक अध्ययन प्रक्रियेवर अवलंबून असते.

(1) दृष्टिकोन (2) अभिवृत्ती (3) सवयी (4) सकारात्मकता

88. उदारमतवादाच्या काळात __________ ही संकल्पना उदयास आली.

(1) भांडवलशाही (2) उपयुक्तता (3) लेइसेझ फेअर (4) यापैकी काहीही नाही

89. ''मनोसामाजिक समस्यांचे निदान आणि समाधान करण्याचा जो नवीन उपाय विकसित झाला आहे ते म्हणजे समाजकार्य होय.'' अशी समाजकार्याची व्याख्या कोणी केली आहे ?

(1) एण्डरसन (2) भारतीय समाजकार्य सम्मेलन

(3) प्रा. राजाराम शास्त्री (4) प्रा. पी.वाय. थोटे

90. ज्यांना इतरांच्या अभिवृत्तीत बदल घडवून आणावा असे वाटते ते सर्वजण आपल्याला __________ करण्यास प्रवृत्त करतात.

(1) पद्धतशीर विचार प्रक्रिया (2) अनुकरण प्रक्रिया

(3) नवगामी विचार प्रक्रिया (4) समायोजन प्रक्रिया

91. समाजकल्याण मंडळाची स्थापना __________ रोजी करण्यात आली.

(1) 26 जानेवारी 1947 (2) 15 ऑगस्ट 1947 (3) 12 ऑगस्ट 1970 (4) 12 ऑगस्ट 1953

92. खालीलपैकी कोणता सिद्धांत हा वृद्धत्त्वाचा सिद्धांत आहे ?

(1) वापर व झीज सिद्धांत (2) अनुवांशिक सिद्धांत

(3) यापैकी कोणताही नाही (4) (1) व (2) दोन्ही पर्याय बरोबर आहे.

93. सन 1924 मध्ये सोशल सर्व्हिस लिगने __________ येथे स्वैच्छिक सामाजिक कार्यकर्त्यांकरिता प्रशिक्षण वर्ग सुरू केले.

(1) पुणे (2) लखनौ (3) मुंबई (4) यापैकी नाही

94. __________ या वर्षापासून गर्भलिंग परीक्षणावर पूर्णपणे बंदी आणण्यात आली आहे.

(1) 1995 (2) 1993 (3) 1980 (4) 1994

95. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 अंतर्गत कलम __________ अन्वये जो कोणी अस्पृश्यतेच्या कारणावरून रुग्णालये, दवाखाना, शिक्षणसंस्था इत्यादी ठिकाणी प्रवेश नाकारेल तो शिक्षेस पात्र ठरेल.

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 7

कच्च्या कामासाठी जागा

Teachingninja.in

**96.** भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत खालील विधाने विचारात घ्या.

(अ) वृद्धांचा प्रश्न आधुनिक आहे.

(ब) शहरी वा ग्रामीण भागात वृद्धांच्या समस्येचे स्वरूप सारखे आहे.

(क) वृद्धांच्या समस्येच्या कारणांपैकी एक कारण संयुक्त कुटुंबाचे विघटन हे आहे.

उपरोक्त पैकी कोणते विधान/विधाने **चूक** आहेत ?

(1) केवळ (अ) (2) केवळ (ब) (3) केवळ (क) (4) केवळ (ब) व (क)

---

**97.** इंग्लंडमध्ये सन __________ मध्ये नवीन गरीब कायदा (द न्यु पुअर लॉ) मंजूर झाला.

(1) 1800 (2) 1905 (3) 1834 (4) 1666

---

**98.** __________ यांनी सामाजिक बहिष्काराचे वर्गीकरण करतांना 'प्रतिकूल बहिष्कार' व 'प्रतिकूल समावेश' ह्या संज्ञा वापरल्या होत्या.

(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (2) महात्मा फुले

(3) कार्ल मार्क्स (4) डॉ. अमर्त्य सेन

---

**99.** जेंव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती निश्चित अशी उद्दिष्ट्ये मनात ठेवून जाणीवपूर्वक इतरांशी आंतरक्रिया सुरू ठेवतात तेंव्हा त्या आंतरक्रिया __________ असतात.

(1) प्रत्यक्ष आंतरक्रिया (2) सांकेतिक आंतरक्रिया

(3) केंद्रिभूत आंतरक्रिया (4) अकेंद्रिभूत आंतरक्रिया

---

**100.** व्यक्तिमत्वाची पुढील व्याख्या कोणत्या शास्त्रज्ञाने केली आहे ?

''व्यक्तिची शरीररचना, वर्तनपद्धती, रुचि, मनोवृत्ति, कृतिसामर्थ्य वा कार्यशक्ती आणि गुणवैशिष्ट्ये यांचे वैशिष्ट्यपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमत्व''

(1) कार्ल जंग (2) सिग्मंड फ्राईड (3) इव्हान पावलोव (4) मन

---

-oOo-

कच्च्या कामासाठी जागा



Teachingninja.in

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) विद्यार्थी'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**

SEAL

Teachingninja.in

Teachingninja.in